नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १३/०७/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील टेकाडी पुलीया वृंदावन लॉन चे बाजुला येथे दि. १२/०७/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– युवराजसिंग लक्ष्मणसिंग ठाकुर वय ३० वर्ष, रा. गोंडेगाव डब्लु.सी.एल.कॉलनी कन्हान याने त्याची एमएच–४०/सीजे– ७६६२ क्रमांकाची हिरो सुपर स्पलेंडर मोटरसायकल ही टेकाडी पुलीया वृंदावन लॉन चे बाजुला उभी करुन बाथरुमला गेले होते. त्यादरम्यान बाजुला बसलेल्या दोन अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीची कि. ९०,०००/–रू. ची मोटरसायकल चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९,३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि फुलझेले मो.क्र. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील वायगाव घोटुर्ली उमरेड येथे दि. ०२/०७/२०२२ चे १८.०० वा. ते दि. ०३/०७/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निकेत शरदचंद्रसिंग बैस, वय ३३ वर्ष, रा. श्रीरामनगर प्लॉट नं. १ उदय नगर चौक, नागपुर धंदा– निकेत ट्रान्सपोर्ट, बेदी कॉम्प्लेक्स डब्लुसीएल उमरेड हे नेहमी प्रमाणे आपल्या डब्लुसीएल उमरेड येथील ऑफिसमध्ये एम.एच–४९/एएक्स– ३९१९ क्रमांकाच्या ॲक्टीवा गाडीने गेले व दिवसभर ऑफिसचे काम करून सायंकाळी १८.०० वा. नागपुरला परत जाण्यास निघाले असता पाउस आल्याने त्यांनी आपली एम.एच–४९/एएक्स– ३९१९ क्रमांकाच्या ॲक्टीवा ही त्यांचे परिचीत असलेले वायगाव घोटुर्ली येथील चुन्नीलाल बेदी यांचे मकानाच्या दरवाजाजवळ हॅन्डल लॉक करून ठेवली व त्यांना गाडी ठेवल्याचे सांगुन बस ने निघुन गेले. दि. ०३/०७/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा. सुमारास चुन्नीलाल बेदी यांनी फोन करून सांगितले की, 'तुने ठेवलेली तुझी ॲक्टीव्हा गाडी घरासमोर दिसत नाही' तेव्हा लगेच फिर्यादी हे नागपुर वरून डब्लुसीएल उमरेड ला गाडी पाहण्यासाठी परत आले. तेव्हा ठेवलेली एम.एच–४९/एएक्स– ३९१९ क्रमांकाच्या ॲक्टीवा किमत ३५,०००/–रू. अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे समजून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते मो.न. ९४२०४०९४५४ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा रुईखैरी येथे दि. १०/०७/२०२२ चे २३.३० ते ११/०७/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मयुर क्रिष्णाजी राउत वय २९ वर्ष, रा. रुईखैरी वार्ड क्रं. २ ता. जि. नागपूर हे बाजार करुन घरी परत आले व त्यांनी त्यांची एमएच— ४०/बीझेड— ०९६२ क्रमांकाची ॲक्टीवा ६ जी मोपेड ही घरासमोर हॅन्डल लॉक करुन ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. २०,०००/— रू. ची मोटरसायकल चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कापसे मो. क्रं. ८८८८८६४९६७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**